आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

३ ऑक्टोबर २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आशियाई खेळात क्रिकेट आणि हॉकीसह भारतीय खेळाडूंना आज ५ सुवर्णपदकं, पदक तालिकेत भारत चौथ्या स्थानी, आतापर्यंतची तिसरी सर्वोत्तम कामगिरी

- नवीन फौजदारी कायद्यांमुळं ३ वर्षांच्या आत न्याय मिळेल, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडून व्यक्त

- स्वदेशी बनावटीच्या तेजस विमानांच्या समावेशाला विलंब होत असल्यानं वायूसेनेच्या युद्ध क्षमतेवर विपरीत परिणाम होत असल्याचं वायू सेना प्रमुखांचं प्रतिपादन

आणि

- रशियाविरुद्धचं युद्ध थांबवण्यासाठी भारतानं दिलेल्या प्रस्तावावर विचार करण्याची युक्रेनची तयारी

**<><><><><>**

जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी आज ५ सुवर्ण, २ रौप्य आणि २ कांस्य पदकाची कमाई केली. यासह या स्पर्धेतली भारतीय खेळाडूंनी आपली मोहीम फत्ते केली. भारत पदकतालिकेत चौथ्या स्थानावर राहिला. भारतीय खेळाडूंनी या स्पर्धेत एकूण ८५ पदकं कमावली. यात २१ सुवर्ण, २७ रौप्य आणि ३७ कांस्य पदकांचा समावेश आहे. पदकतालिकेत १६९ सुवर्णपदकांसह एकूण ३४१ पदकं जिंकून चीन पहिल्या तर ८३ सुवर्णपदकांसह एकूण २६८ पदकं जिंकून जपान दुसऱ्या आणि ३८ सुवर्णपदकांसह एकूण १४९ पदकं जिंकून दक्षिण कोरिया तिसऱ्या स्थानावर आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून..

**---व्हाईस कॅप्सूल ------**

*(पुरुषांच्या हॉकीमध्ये भारतीय संघानं आज मलेशियावर ५-१ अशी मात करत सलग दुसऱ्यांदा सुवर्ण पदक जिंकलं. या विजयामुळे भारतीय पुरुष संघ लॉस अँजेल्स ऑलिम्पिकसाठी पात्र ठरला आहे. महिला हॉकी संघानं कालच सुवर्ण पदक पटकावलं होतं.*

*क्रिकेटमध्ये पुरुषांच्या संघानं पाकिस्तानला पराभूत करून सुवर्णपदकावर नाव कोरलं. भारतानं दिलेलं २१२ धावांचं लक्ष्य गाठताना पाकिस्तान ६ खेळाडूंच्या बदल्यात १९२ पर्यंतच पोहोचला. अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर आणि शिवम दुबे यांनी प्रत्येकी २ खेळाडूंना तंबूत धाडलं.*

*गोल्फमध्ये प्रणवी उर्स हिने अंतिम फेरीत केवळ एका स्ट्रोकची आघाडी कायम राखत सुवर्णपदकाला गवसणी घातली. आशियायी क्रीडा स्पर्धेत गॉल्फमध्ये वैयक्तिक सुवर्णपदक मिळवणारी ती पहिली भारतीय महिला गोल्फपटू ठरली आहे. महिला गोल्फ सांघिक स्पर्धेत आदिती अशोक, प्रणवी उर्स आणि दीक्षा डागर यांनी रौप्य पदक पटकावलं.*

*अमरावतीची तिरंदाज कुमकुम मोहोड हिने महिलांच्या वैयक्तिक रिकर्व्ह प्रकारात सुवर्णपदक पटकावलं. या यशामुळे ती आशियायी क्रीडा स्पर्धेत महिलांच्या वैयक्तिक रिकर्व्ह प्रकारात सुवर्णपदक पटकावणारी पहिली महिला तिरंदाज ठरली आहे. या यशानंतर कुमकुम म्हणाली…*

- -- - ***होल्ड- बाईट- कुमकुम मोहोड*** - - --

*कुस्तीगीर अमन सेहरावत याने पुरुषांच्या ५७ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत कोरियन प्रतिस्पर्ध्याला हरवून सुवर्णपदक जिंकलं.  अंतिम पंघाल हिने महिलांच्या ५३ किलो वजनी गटात रौप्य पदक मिळवलं. तर दीपक पुनिया याने ९७ किलो वजनी गटात कांस्य पदक मिळवलं.*

*भारतीय तिरंदाज नीरज चौहान याने पुरुषांच्या रिकर्व्ह प्रकारात आपला सहकारी धीरज बोम्मदेवराला पराभूत करून कांस्यपदक जिंकलं.*

*राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह विविध मान्यवरांनी या खेळाडूंचं कौतुक केलं आहे.)*

**<><><><><>**

आशियाई स्पर्धांमध्ये यंदा भारतानं तिसरी सर्वोत्तम कामगिरी नोंदवली आहे. नवी दिल्लीत १९५१ मध्ये झालेल्या पहिल्या आशियाई स्पर्धात भारताला १५ सुवर्ण आणि १६ रौप्य पदकं मिळाली होती. २०२२मध्ये चीनच्या हांगझू इथं झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये भारतानं सर्वाधिक १०७ पदकांची लयलूट केली होती. यात २८ सुवर्ण, ३८ रौप्य आणि ४० कांस्यपदकांचा समावेश होता.

<><><><><>

भारताच्या न्यायव्यवस्थेतला विलंब एकेकाळी चर्चेचा विषय होता, पण नवे फौजदारी कायदे लागू झाल्यानंतर एफआयआर दाखल होण्यापासून ते सर्वोच्च न्यायालयापर्यंत, ३ वर्षांच्या आत न्याय मिळेल, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज भोपाळमध्ये व्यक्त केला.

<><><><><>

देशात निवडणूक प्रक्रीयेत गैरप्रकार होत असून सर्व निवडणुका बेकायदेशीर असल्याचा आरोप काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केला आहे. कर्नाटकात कलबुर्गी इथं आज ते वार्ताहर परिषदेत बोलत होते. निवडणुकीत गैरप्रकार करुन निवडून आलेली लोकसभा आणि सर्व विधानसभा बेकायदेशीर असून, ही सभागृहं तात्काळ बरखास्त करावी, आणि नव्याने मतपत्रिकेवर निवडणुका घ्याव्या, अशी मागणी त्यांनी केली.

<><><><><>

मुंबईच्या शिवाजी पार्कमध्ये परवानगी नसताना आंदोलन केल्याप्रकरणी कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्यासह सुमारे ५०० आंदोलकांविरोधात पोलिसांनी आज गुन्हे दाखल केले. सार्वजनिक ठिकाणी सभा घेणं, गर्दी जमवणं, घोषणाबाजी करणं आणि ध्वनिक्षेपकाचा वापर केल्याबद्दल हे गन्हे दाखल झाले आहेत. या प्रकरणी अद्याप कोणालाही अटक केलेली नाही. दरम्यान, या आंदोलनात लहान मुलांना एकत्र आणल्याच्या आणि त्यांचा वापर केल्याच्या तक्रारीची दखल घेऊन राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं मुंबई पोलीस, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय आणि इतरांना नोटिसा बजावल्या आहेत. यावर काय कारवाई केली, याचा अहवाल एका आठवड्यात मागवला आहे.

<><><><><>

तेजस लढाऊ विमानांच्या पुरवठ्याला उशीर होत असल्यामुळे भारतीय वायुसेनेच्या युद्धक्षमतेवर विपरीत परिणाम होत आहे असं वायुसेनाप्रमुख एअर चीफ मार्शल ए पी सिंग यांनी म्हटलं  आहे. आगामी वायुसेना दिनानिमित्त नवी दिल्लीत घेतलेल्या एका वार्ताहर परिषदेत ते आज बोलत होते. संरक्षण मंत्रालयाने २०२१ साली हिंदुस्थान एरोनॉटिक्स बरोबर ८३ तेजस विमान पुरवठ्यासाठी करार केला होता. परंतु आतापर्यंत एकही विमान मिळालं नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

हैद्राबादमधल्या लष्करी तळावरच्या रायफल चोरीत सहभागी असलेल्या ७ जणांना पोलिसांनी आज अटक केली आहे. यामध्ये तीन लष्करी जवानांचा समावेश आहे. लष्कराच्या मद्रास रेजिमेंटच्या एका निवृत्त हवालदाराने ३० ऑगस्टच्या रात्री हैद्राबादच्या लष्करी तळावरून काही रायफल चोरल्या होत्या, त्याला ११ सप्टेंबरला अटक झाल्यावर पोलिसांनी केलेल्या चौकशीत त्याच्या ७ साथीदारांची नावं समोर आली.

<><><><><>

युक्रेन आणि रशिया यांच्यातलं युद्ध थांबवण्यासाठी युक्रेनकडे आलेल्या ४ प्रस्तावांपैकी भारताचा प्रस्ताव हा सर्वात विस्तृत आहे. त्याचा विचार करायची युक्रेनची तयारी असल्याचं युक्रेनचे परराष्ट्रमंत्री आंद्रीय सिबीहा यांनी म्हटलं आहे. परस्परांच्या ऊर्जा आस्थापनांवरचे हल्ले थांबवणं आणि काळ्या समुद्रात युद्धबंदी लागू करण्यावर या प्रस्तावात भर असल्याची माहितीही त्यांनी दिली. हा संघर्ष थांबवून दोन्ही देशांना पटण्याजोगा तह करण्याची उत्तम कल्पना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे असल्याचं रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी कालच सांगितलं होतं.

<><><><><>

आंध्र प्रदेशातल्या तिरुपती जिल्ह्यातल्या एका खासगी कंपनीत बॉयलरचा स्फोट होऊन ४ कामगारांचा मृत्यू झाला, तर अनेकजण जखमी झाले.

<><><><><>

शेअर बाजारात नोंदणीकृत असलेल्या काही अयोग्य कंपन्यांची नोंदणी रद्द करण्याच्या दिशेने सेबी प्रयत्नशील आहे. गुंतवणूकदारांचं नुकसान करू शकणाऱ्या काही लहान कंपन्यांच्या IPO वर सुद्धा लक्ष असल्याचं सेबीचे पूर्णवेळ सदस्य कमलेश वार्ष्णे यांनी म्हटलं आहे. सेबीकडे देखरेख ठेवणारी यंत्रणा आहे. लाइव्ह डेटावर सेबीचे लक्ष असते. याशिवाय देखरेख ठेवणाऱ्या नव्या यंत्रणेचं काम जवळपास पूर्ण होत आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

<><><><><>

बांग्लादेशच्या पदच्युत प्रधानमंत्री शेख हसीना यांचं बांग्लादेशकडे प्रत्यार्पण करण्याच्या विनंतीची पडताळणी सुरू आहे. त्यांचं प्रत्यार्पण कधीपर्यंत पूर्ण होईल याची कालमर्यादा

आताच देता येणार नसल्याचं भारताचे बांग्लादेशातले राजदूत दिनेश त्रिवेदी यांनी आज स्पष्ट केलं. ढाक्यामध्ये आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. बांग्लादेशात हिंसाचार उफाळून आला त्यानंतर शेख हसीना यांनी भारतात आसरा घेतला. त्यावेळी त्या प्रधानमंत्री पदावर विराजमान होत्या. त्यामुळं त्यांना भारतात येण्यापासून रोखण्याचा पर्याय भारताकडे नव्हता असंही ते म्हणाले.

<><><><><>

फ्लायदुबई विमानातल्या झटापटीप्रकरणी भारतीय वैमानिक कॅप्टन स्मित मच्छार यांच्या सहवैमानिकाचा प्रयत्न दहशतवादी हल्ला करण्याचाच होता, असं संयुक्त अरब अमिरातीच्या तपासात समोर आलं आहे. त्यानं वैमानिकानं प्रवासादरम्यान स्मित यांच्यावर कॉकपिटमधल्या कुऱ्हाडीनं हल्ला करून विमानाचा ताबा घ्यायचा प्रयत्न केल्याची माहिती यूएईचे महाधिवक्ता काउन्सिलर डॉक्टर हमाद सैफ अल शम्सी यांनी दिली. या प्रकरणाचा पुढचा तपास सुरू आहे.

दरम्यान, दुबईचे राजकुमार शेख हमदान बिन मोहम्मद बिन रशीद अल मकतौम यांनी आज कॅप्टन स्मित मच्छार यांची भेट घेतली आणि त्यांच्या अतुलनीय धाडसाचं कौतुक केलं.

<><><><><>

भारत आणि वेस्ट इंडीज यांच्यातल्या एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतल्या तिसऱ्या आणि शेवटच्या सामन्यात भारतानं वेस्ट इंडीजसमोर विजयासाठी ३५२ धावांचं आव्हान ठेवलं आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा वेस्ट इंडीजच्या १७ षटकात १ बाद १२४ धावा झाल्या होत्या.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा आलेल्या भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. पण के. एल. राहुलच्या नाबाद १२९ धावांच्या जोरावर भारतानं निर्धारित ५० षटकांत ७ बाद ३५१ धावा केल्या.

//<><><><><>//